# प्रीतिसंगम

रविवार
०६.०७.२०२५
किंमत २ रूपये
वर्ष २९ वे अंक ६६ पाने ६
R.N.I.No.MAHMAR./2001/10338
www.pritisangam.com






# हरिनामाने दुमदुमली पंढरी!

## आषाढी एकादशीला २० लाखाहून अधिक भाविक दाखल

**पंढरपूर/यशवंत कुंभारः-**

अवघे गर्जे पंढरपूर ।
चालला नामाचा गजर ।।

अशा संतोक्तिची प्रचिती देत असलेला तीर्थक्षेत्र पंढरपूरचा आषाढी सोहळा आज रविवार (दि. ०६) भक्तिमय वातावरणात व प्रचंड उत्साहात साजरा होत आहे. संतांच्या पालख्या शनिवारी सायंकाळी तीर्थक्षेत्र पंढरपुरात दाखल झाल्या आहेत. सध्या पंढरीत सुमारे २० लाखांहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. तर दर्शन रांग ७ कि.मी. लांबपर्यंत पोहचली असून, भाविकांची संख्या वाढतच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दुपारीच पंढरीत दाखल झाले असून, विविध ठिकाणी भेटी देताना दिसत आहेत.

श्री विठ्ठल मंदिराचे महाद्वार, पश्चिमद्वार,नगरप्रदक्षिणा मार्ग, वीर सावरकर पथसह भवताल गर्दीने फुलून गेला आहे. या भागांत व्यापाऱ्यांनी दुकाने थाटली आहेत. अतिशय सुंदर मांडणी, आकर्षक वीज व्यवस्था, यामुळे मंदिर परिसरातील दुकाने लक्ष वेधून घेत आहेत. प्रसाद, कुंकू-बुक्का, उदबत्ती, तुळशीच्या माळा, गोपीचंदन, टाळ, मृदंग, वीणा, तबला, बांगड्या, देवाचे फोटो, आध्यात्मिक ग्रंथ, चुरमुरे, पेढा-बर्फी आदींची दुकाने लक्षवेधी ठरत आहेत. याठिकाणी खरेदीसाठी भाविकांची लगबग दिसून येत आहे. याशिवाय घोंगडी, सोलापुरी चादर अशा जिन्नसांची दुकानेही सजली असून प्रशासन यंत्रणाही लक्ष ठेवून आहे. चंद्रभागेच्या तिरी वैष्णवांचा मेळा भरल्याचे पहायला मिळत आहे.

## ज्ञानेश्वर महाराज पालखीचे मुख्यमंत्र्यांनी घेतले दर्शन

**पंढरपूर/प्रतिनिधीः-**

आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला.

वातावरण टाळ, मृदंग आणि विठू माऊलीच्या नाम गजरात भक्तीरसात न्हाऊन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले.

वाखरी येथे जिल्हा प्रशासनामार्फत वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणी देखील मुख्यमंत्री फडणीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.



# कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा

## १८ वर्षानंतर ठाकरे बंधू आले एकत्र

**मुंबई/प्रतिनिधीः-**

महाराष्ट्रात पहिलीपासून तृतीय भाषा शिकवण्याचा राज्य सरकारने आध्यादेश काढला आणि या आध्यादेशाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्रित येवू लागले. मोर्चाची घोषणा केली आणि आध्यादेश सरकारने मागे घेतला आवाजी मराठीचा विजयोत्सव साजरा करण्यासाठी तब्बल १८ वर्षानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच व्यासपिठावर आले. जे बाळासाहेबांना जमले नाही, ते देवेंद्र फढणवीस यांना जमले. तुमची सत्ता विधानभवनात असेल मात्र, आमची सत्ता रस्त्यावर आहे. महाराष्ट्राच्या आड कोणी आल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशारा राज ठाकरे यांनी दिला. तर आनाजी पंतांनी आमच्या दोघातील अंतरपाट काढला. असा टोला मुख्यमंत्र्यांना लगावत एकत्र आलो आहे, एकत्र राहण्यासाठीच असे सांगूल तुटू नका फुटू नका आणि मराठी ठसा पुसू नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी करत भाषेची सक्ती दाखवली तर आम्ही शक्ती दाखवू असा इशारा दिला.

त्रिभाषा सूत्र आणि हिंदी शिकवण्याच्या विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी आंदोलन उभं केलं होतं. ठाकरे बंधूंनी मोर्चाचा इशारा दिल्यानंतर सरकारने या निर्णयासंदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द केले. त्यानंतर वरळी येथे विजयी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची एकत्रित सभा पार पडली. भाषणात बोलताना मुंबई वेगळी करण्यासाठी हिंदी भाषेचा मुद्दा वापरला गेल्याचे राज ठाकरे म्हणाले. तसेच आमच्यावर काहीही लादण्याचा प्रयत्न करु नका असा इशारा राज ठाकरेंनी दिला.

एक भाषा उभी करायला खूप लोकांची मेहनत लागते. भाषा अशाच उभ्या राहत नसतात. हिंद प्रांतावर सव्वाशे वर्ष मराठ्यांनी राज्य केलं. त्यावेळी आम्ही मराठी लादली का? हिंदी २०० वर्षांपूर्वीची भाषा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातसुद्धा हिंदी नव्हती. मग हे कशासाठी आणि कोणासाठी करायचं आहे. यांनी फक्त चाचपडून पाहिलं. मुंबई स्वतंत्र करता येते का यासाठी जरा अगोदर भाषेला डिवचून बघू आणि महाराष्ट्र शांत राहिला तर पुढे ते पाऊल टाकू. कुणाची माय व्यायली आहे त्यांनी महाराष्ट्रात आणि मुंबईत हात घालून दाखवावा. काय मस्करी वाटली का? काहीही अंगावर लादायचा प्रयत्न करू नका, असं राज ठाकरे यांनी म्हटले.



हिंदीची सक्ती कशाला करता? हिंदी बोलणारे राज्य मागास आहेत आणि हिंदी न बोलणारे राज्य प्रगत आहेत. मग आम्ही हिंदी शिकून असा काय विकास होणार आहे? कुणालाही न विचारता हिंदी सक्ती कशासाठी? तुमच्याकडे सत्ता आहे म्हणून का? तुमची सत्ता विधानभवनात. इथं रस्त्यावर आमची सत्ता आहे, असा इशारा राज ठाकरेंनी दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, बऱ्याच वर्षांनी दोघांची भेट व्यासपीठावर झाली आहे. आज आमचं एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे. पण एक गोष्ट नक्की आमच्या दोघांमधला जो अंतरपाट होता तो अनाजी पंतांनी दूर केला. आता अक्षता टाकण्याची तुमच्याकडून अपेक्षा नाही. एकत्र आलोय, एकत्र राहण्यासाठी. मुख्यमंत्री असताना मराठीची सक्ती केली आणि करणारच. म मराठीचा नाही महापालिकेचा आहे असा आरोप करतात, मी सांगतो म महापालिकेचा नाही तर महाराष्ट्राचा आहे.

भाजपा ही अफवांची फॅक्ट्री आहे. हिंदुत्व ही कोणत्याही भाषेची मक्तेदारी नाही. आम्ही अस्सल मराठी बोलणारे तुमच्यापेक्षा जास्त कडवट, कट्टर, देशाभिमानी हिंदू आहोत. तुम्ही काय आम्हाला हिंदुत्व शिकवताय. ९२-९३ मध्ये जे काही घडलं तेव्हा मुंबईतल्या अमराठी लोकांनाही हिंदू म्हणून शिवसैनिकांनी मराठी माणसानं वाचवलं. भाषेच्या नावाखाली गुंडगिरी सहन केली जाणार नाही असं फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रात मराठी माणूस न्याय मागण्यासाठी आंदोलन करत असेल आणि त्याला तुम्ही गुंड म्हणत असाल तर आम्ही गुंड आहोत असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी टीकास्त्र सोडलं आहे.




### राज-उद्धव यांची गळाभेट आणि आदित्य-अमितचाही हातात हात

विजयी मेळाव्याच्या सुरुवातील राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची स्टेजवर ग्रँड एन्ट्री झाली. त्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकमेकांना मिठी मारली. तर विजयी मेळावा संपल्यानंतर ठाकरे कुटुंबीयांनी एकत्र फोटो काढले. यावेळी उद्धव ठाकरेंच्या पत्नी रश्मी ठाकरे, राज ठाकरेंच्या पत्नी शर्मिला ठाकरे देखील स्टेजवर आल्या. यावेळी आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंनी देखील स्टेजवर पुढे येत हातात हात मिळवला. विशेष म्हणजे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांना स्टेजवर बोलावले. यानंतर आदित्य ठाकरे काका राज ठाकरेंच्या बाजूला आणि अमित ठाकरे काका उद्धव ठाकरेंच्या बाजूला उभे राहिले. यावेळी उद्धव ठाकरेंनी अमित ठाकरेंना जवळ घेतल्याचे पाहायला मिळाले.

# कोयना धरणात ६५.६ टिएमसी पाणीसाठा

## पावसाचा जोर वाढला; शेतकऱ्यांच्यावर नैसर्गिक संकट.. ओला दुष्काळ जाहीर करुन भरपाई देण्याची मागणी



**पाटण/प्रतिनिधी : -**

कोयना धरण पाणलोट क्षेत्रासह परिसरात संततधार सुरू असलेल्या धरणाचा पाणीसाठा ६५.६ टिएमसी झाला असून झपाट्याने वाढत चाललली पाणीपातळी ६२ टक्के झाली आहे. शनिवारी सकाळपासून थोडी उघडझाप दिलेल्या पावसाने दुपारपासून पुन्हा जोर धरला आहे. या पावसाने कोयना परिसरासह पाटण तालुक्यातील सर्वच नद्या पुन्हा दुथडी भरुन वाहू लागल्या आहेत.

मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस थांबायचे नावच घेत नसल्याने पाटण तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या असून शेतकऱ्यांच्यावर नैसर्गिक संकट ओढावले आहे. पुढील वर्षभराची चिंता शेतकऱ्यांपुढे दिसत आहे. यामुळे पाटण तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

गेल्या २४ तासांत शुक्रवारी सायंकाळी ५ वा. ते शनिवारी सायंकाळी ५ वा.पर्यंत कोयना - १०९, (१९१५) मि.मी, नवजा - १२१, (१७१७) मि.मी, महाबळेश्वर - १०३, (१७८८) मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

या पावसाने पाटण तालुक्यात कोयना, केरा, मोरणा, काजळी, काफणी, वांग, उत्तर मांड, तारळी या नद्या व ओढे, नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तालुक्यातील सर्वच धरणांच्या पाणीपातळीत कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे वाहत्या पाण्यात कोणी उतरु नये, असे प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. तसेच हवामान खात्याने सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात पुढील २४ तासांत अतिवृष्टीचा इशारा दिला असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# चांदोली धरण ८० टक्के भरले; २७.५३ टीएमसी पाणीसाठा

## चांदोली धरणाचे चारही दरवाजे ०.७० मीटरने उघडले ; ३१०० क्युसेक ने विसर्ग सुरू

**शिराळा/प्रतिनिधी:**

शिराळा शहरास तालुक्यात पाऊस उन्हाचा पाठशिवणीचा खेळ सुरू आहे.चांदोली धरण पाणलोट क्षेत्रात तसेच धरण परिसरात अतिवृष्टी सुरू आहे.चांदोली धरण ८० टक्के भरले आहे. आज शनिवार दि.५रोजी दुपारी साडे बारा वाजता चांदोली धरणाचे चारही स्वयंचलित दरवाजे एक मीटरने उघडण्यात आले आहेत त्यामुळे सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गतवर्षी पेक्षा दुप्पट पाऊस झाला आहे. कोकरुड -रेठरे बंधारा अजूनही पाण्याखाली आहे.

**चांदोली धरण पाणलोट क्षेत्रातील पावसाची नोंद**

पाथरपुंज-९२ मिमी (२४२४मिमी)
निवळे - ८४(२२३६)
धनगरवाडा -४६(१३३२)
चांदोली - ४८ (१२९३)

**सतर्कतेचा इशारा**

चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी होत असल्याने धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी सांडवा पातळीच्या वरती आल्यानंतर जलाशय परिचलन सूची प्रमाणे धरणाची पाणी पातळी नियंत्रीत ठेवणे करिता धरणातून वक्रद्वाराद्वारे २८७० व वीजनिर्मिती केंद्रातून १६३० असा एकूण ४५०० क्युसेक ने विसर्ग सुरू केला होता मात्र नंतर १४७० व विद्युतगृह १६३०असा एकूण ३१०० क्युसेक पर्यंत विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे, त्यामुळे नदीच्या पाणी पातळीमध्ये वाढ होणार आहे.

बाबासाहेब पाटील
उपविभागीय अभियंता, वारणा धरण व्यवस्थापन

गतवर्षी २३ जुलै ला धरणाचे दोन दरवाजे उघडले होते. यावर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाल्याने यावेळी सतरा दिवस अगोदर दरवाजे उघडले आहेत.

चांदोली धरण पाणलोट क्षेत्रातील पाथरपुंज,निवळे , धनगरवाडा, चांदोली येथे पाऊस सुरूच आहे. यावर्षी पाथरपुंज बरोबर निवळे येथे पावसाचे प्रमाण वाढले आहे तसेच सोळा वेळा अतिवृष्टी झाली आहे.गतवर्षी चांदोली धरणात १२.७४ टीएमसी पाणीसाठा होता तर यावर्षी २७.५३ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.चांदोली धरणात ११हजार १५७ क्युसेक ने आवक तर वीजनिर्मिती केंद्रातून १६३० व चार दरवाज्यातून १४७० असा एकूण ३१०० क्यूसेक ने नदीपात्रात विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.



पावसामुळे वाकुर्डे बुद्रुक येथील करमजाई तलाव,अंत्री बुद्रुक तलाव , रेठरे धरण, मोरणा धरण , टाकवे तलाव, शिवणी तलाव तसेच सर्व ४९ पाझर तलाव भरले आहेत.

गतवर्षी चांदोली धरणात १२.७४ टीएमसी पाणीसाठा होता तर यावर्षी २७.५३टीएमसी पाणीसाठा झाला आहे.गतवर्षी पेक्षा १४.७९ टीएमसी जादा पाणीसाठा आहे.

# खंबाटकी घाटात आयशर ट्रकला आग

## २० लाखांचे नुकसान

**वाई/प्रतिनिधी:**

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील खंबाटकी घाटात एका आयशर माल ट्रकला शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. या दुर्घटनेत सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटना स्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, शकिल आलम (वय २३) हा चालक आयशर माल ट्रक (क्र. घ-०१/-ट ०५५७) घेऊन मुंबईहून बंगळूरकडे निघाला होता. या ट्रकमध्ये प्रदर्शनात वापरले जाणारे साहित्य होते. खंबाटकी घाटातून जात असताना, अचानक ट्रकच्या केबिनमध्ये शॉर्ट सर्किट होऊन आग लागली.आगीची कल्पना येताच चालक शकिल आलम आणि साहित्याचे मालक अमन कुमार असे दोघेजण तातडीने ट्रकमधून बाहेर पडले.त्यांनी अग्निरोधक यंत्राच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला, परंतु वाऱ्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले आणि क्षणार्धात वाहन व त्यातील साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले.



या घटनेची माहिती खंडाळा पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संतोष मस्के आणि महामार्गाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब वंजारे यांना मिळताच ते तातडीने आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. एशियन पेंट आणि वाई नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आग आटोक्यात आणली. तो पर्यंत आगीमुळे खंडाळ्याच्या दिशेने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# जावळीतील अवैध दारू विक्रीच्या विरोधात व्यसनमुक्त संघ आक्रमक

## दारूचा साठा अजित दादा पवार यांना भेट देणार :विलास बाबा जवळ

**सातारा/प्रतिनिधी:**

जावली तालुक्यातील अवैध दारू विक्री व्यवसायाच्या विरोधात व्यसनमुक्त युवक संघ पुन्हा आक्रमक झाला आहे .येथील अवैध दारू विक्री १५ ऑगस्ट पूर्वी बंद झाली नाही तर व्यसनमुक्त संघाचे युवक स्वतः अवैध दारू साठा पकडतील आणि तो साठा महाराष्ट्र राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री अजित दादा पवार यांना भेट देतील असा इशारा संघाचे मार्गदर्शक व प्रमुख विलास बाबा जवळ यांनी दिला आहे .

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद आहे की जावळी तालुक्यात सतरा वर्षांपूर्वी दहा महिने २३ दिवसात सहा गावातून १३ दारूची दुकाने महिलांनी मतदानाच्या माध्यमातून बंद केली होती .गुरुवर्य बंडातात्या कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व्यसनमुक्त युवक संघटना वारंवार आंदोलने करीत आहे .तेवढ्यापुरते उत्पादन शुल्क विभाग व पोलीस प्रशासन कारवाई केल्याचे दाखवतात पण थोड्या दिवसात पुन्हा बेकायदेशीर दारू विक्री सुरू होते. मेढा येथे खुलेआम दारू विक्रेता आणि त्याची अवैध दारू महासंघाच्या माध्यमातून पकडण्यात आली होती .उत्पादन शुल्क विभागाची गाडी दोन दिवस फिरली आणि पुन्हा दोन दिवसात कारवाया थंडावल्या .पोलीस अधीक्षकांनी सुद्धा सुरुवातीला अवैध दारू विक्रीवर धडाधड कारवाया केल्या मात्र गेल्या चार महिन्यात पुन्हा मेढा व कुडाळच्या भर बाजारात मटका अवैध दारू व्यवसाय सुरू आहेत.

सातारा जिल्हा पोलीस व उत्पादन शुल्क विभाग यांना अवैध दारू विक्री व्यवसायाचे कंबरडे मोडायचे नसेल तर व्यसनमुक्त युवक संघटनेच्या महिला व पदाधिकारी या व्यवसायावर कारवाई करतील . १५ ऑगस्ट पूर्वी हे व्यवसाय तातडीने बंद व्हावेत अन्यथा दारू विक्रेत्यांच्या अड्ड्यावर व्यसनमुक्त युवक संघ छापा मारून साठे पकडतील आणि त्याची भेट उत्पादन शुल्कमंत्र्यांना आम्ही देणार असल्याचा इशारा विलास बाबा जवळ यांनी दिला आहे.

# पाटणच्या शेतांना पर्यटनस्थळ घोषित करा

## विक्रमबाबा पाटणकर यांची उपरोधात्मक मागणी

**पाटण /प्रतिनिधी : -**

मे महिन्यापासून सुरु असलेल्या अनियमित पावसामुळे पाटण तालुक्यातील शेतकरी सद्या नैसर्गिक आडचणीत सापडला आह. काही शेतकऱ्यांची पेरणी झाली, पण पिकांऐवजी गवत आणि शोभिवंत फुलांचा बहर उगवला आहे. यामुळे सगळीकडे हिरवाई दिसत असली तरी, ती शेतकऱ्यांच्या काहीच उपयोगाची नाही. अशा विचित्र परिस्थितीवर खोचक भाष्य करताना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रमबाबा पाटणकर यांनी पाटण तालुकाच पर्यटनस्थळ म्हणून जाहीर करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना विक्रमबाबा पाटणकर म्हणाले, पाटण तालुक्याच्या भौगोलिक आणि हवामानातील वैविध्यामुळे दर चार किलोमीटरला निसर्ग बदलतो. नवजा ते नवारस्ता या छोट्या अंतरातसुद्धा पावसाच्या प्रमाणात मोठी तफावत आहे. अशा असमान पावसामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या फसल्या आहेत. शेतकरी उभ्या पावसात पेरणी करत राहिले. कुठे बियाणे कुजली, कुठे उगवलीच नाही, तर कुठे गवत आणि फुलांची भरमसाठ वाढ झाली आहे. आता प्रश्न असा आहे की, जनावरांना गवत आहे, पण माणसांनी काय खायचं? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

श्री. पाटणकर म्हणाले, शेतात उगवलेली फुलं बघायला पर्यटक शेतकऱ्यांच्या बांधावर आले, तर पर्यटनालाही चालना मिळेल. रस्ते बंद आणि आचारसंहिता लागू असल्याने तालुक्यातील पर्यटन ठप्प झाले आहे. त्यामुळे शेतात उगवलेल्या फुलांनाच पर्यटकांसाठी आकर्षण बनवायचं तर, पाटणला पर्यटन झोन म्हणून घोषित करा. शेवटी, तालुक्यात झालेल्या विधायक कामांचा आढावा घेत तालुक्यात आणखी एक झोन तयार करून, हेरिटेज स्थळांची अधिकृत नोंद करत पर्यटनाला चालना देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

# अजिंक्य बझार परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा/प्रतिनिधी:**

अजिंक्य बझार परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक एक ते दोन दरम्यान सारिका लक्ष्मण खडतरे रा. शाहूनगर, सातारा यांची यामाहा कंपनीची दुचाकी क्र. एमएच ११ सीएफ ७०१४ अज्ञात चोरट्याने अजिंक्य बजार चौक, शाहूनगर, राधाकृष्ण केटरर्स व स्नॅक्स दुकानासमोरून चोरून नेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार पाटोळे करीत आहेत.

# वाई पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक व हवालदार लाच लाचलूचपतच्या जाळ्यात

**वाई/प्रतिनिधी:**

वाई पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक बिपीन बाळकृष्ण चव्हाण व पोलीस हवालदार उमेश दत्तात्रय गहिण यांना पंधरा हजार रुपयांची लाच घेताना सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. या घटनेमुळे आज पर्यंत वाईच्या इतर पोलिस अधिकारी आणी कर्मचाऱ्यांनी केलेल्या चांगल्या कामांना देखील कलंक लागला आहे.

तक्रारदार यांनी वाई पोलीस ठाणे येथे त्यांचेविरूद्ध महिलेच्या तक्रारीवरून सामुहीक अत्याचाराचा गुन्हा दाखल न करणेकरीता होत असलेल्या लाच मागणी बाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ४ जुलै २०२५ रोजी वाई पोलीस ठाण्याच्या आवारात केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये पोलीस हवालदार गहिण यांनी उपनिरीक्षक चव्हाण यांचे करीता तक्रारदार यांचेवर गुन्हा दाखल न करणेकरीता पंचासमक्ष रूपये २० हजाराची लाच मागणी करून तडजोडी अंती १५ हजार रूपये लाच रक्कम स्विकाण्याचे मान्य करून ती लाच रक्कम प्रशासकीय इमारती मधील पोलीस ठाणेचे बीट अंमलदार कक्षात स्विकारली. तसेच उपनिरीक्षक चव्हाण व हवालदार गहिण याचे समवेत तक्रारदार याचेशी पंचासमक्ष झालेल्या पडताळणीमध्ये तक्रारदारास शिवीगाळ दमदाटी करून हाताने चापटी मारून अटक करण्याची भिती दाखवून लाच मागणीस प्रोत्साहन दिले. तक्रारदार यांनी लाच मागणीस होकार दर्शवताच त्यास सांगेल तेव्हा साक्षीदार व्हायचं असे बोलून हवालदार गहिण याचे लाच मागणीस प्रोत्साहन दिले. सदर लाच स्वीकारताना लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले.

सदर कारवाई सातारा लाच लुचपत विभागाचे उपनिरीक्षक राजेश वाघमारे, पोलीस हवालदार नितीन गोगावले, गणेश ताटे, निलेश राजपुरे यांनी केली. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक राजेश वाघमारे करीत आहेत.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा खून केल्याप्रकरणी आरोपीस फाशीची सजा सुनावली

**वाई/प्रतिनिधी:**

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आज वाई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. मेहरे यांनी आरोपी अरुण परबती बिरामणे (वय ३८, रा. वाघजयवाडी, ता. वाई ) याला फाशीची सजा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अरुण परबती बिरामणे हे पत्नी नीलम अरुण बिरामणे वय २६ व पत्नीची बहीण वर्षा दत्तात्रय जाधव वय २२ यांच्यासमवेत बोपर्डी येथे भाड्याच्या खोलीमध्ये राहत होते. सौ निलम बिरामणे व वर्षा जाधव या एमआयडीसी वाई येथे कामास होत्या. तर अरुण बीरामने हे वाघजाईवाडी येथे येऊन जाऊन शेती करीत होते. चारित्र्याच्या संशयावरून अरुण बिरामणे यांनी २२ नोव्हेंबर २०१६ रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास चाकूने पत्नी सौ. नीलम हिच्या छातीवर, हातावर, पोटावर वार केले. यावेळी मेहुणी वर्षा ही सोडविण्यासाठी मध्ये आली असता तिच्याही छातीवर व हातावर चाकूने वार केले. यामध्ये सौ. नीलम ही जागीच ठार झाली तर मेहुणी वर्षा ही गंभीर जखमी झाली.

यावेळी झालेल्या गोंधळामुळे घरमालक व शेजारी यांनी घराचा दरवाजा वाजवून काय प्रकार आहे असे विचारले. मात्र दरवाजा न उघडल्याने त्यांनी रूमचा पत्रा उचकटून आत पहिले असता दोघीही रक्ताच्या थारोळ्यात पडल्याच्या दिसून आल्या. यावेळी आरोपीने तेथून पळ काढला. घरमालक ज्ञानेश्वर तुकाराम गाढवे यांनी पोलिसांना याबाबत सांगितले व ॲम्ब्युलन्सला फोन केला.

याकामी सरकारी वकील ए. आर. कुलकर्णी यांनी तर आरोपीच्या वतीने सौ. एन. एम. मोकाशी यांनी काम पाहिले. तपासी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक बी. डी. होवाळ यांनी काम पाहिले. सरकारी पक्षाच्या वतीने वीस साक्षीदार तपासण्यात आले. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. एन. मेहरे यांनी आरोपीस मरेपर्यंत फाशी तर धारदार शस्त्राने हल्ला केल्याबद्दल जन्मठेपेची सजा सुनावली.

# डॉ महेश पालकर यांनी शैक्षणिक कार्यात ठसा उमटविला

## वनिता गोरे

**सातारा/प्रतिनिधी:**

सातारा जिल्ह्याचे सुपुत्र व पाटण सारख्या दुर्गम भागातील सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती असलेले डॉ. महेश पालकर हे महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाच्या संचालकपदी शासनाच्या वतीने नियुक्ती झाली. याबद्दल जिल्ह्यातील माजी शिक्षणाधिकारी व जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व जेष्ठ साहित्यीक विचारवंत व कलावंत शिक्षणप्रेमी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



यावेळी महावीर विद्यालय कोल्हापूर येथील प्राध्यापक डॉ. शरद गायकवाड. नायब तहसीलदार संजय बैलकर. माजी शिक्षणाधिकारी राजेंद्र बाबर. संभाजी जंगम. प्राचार्य. शौकत शेख. प्राध्यापक दिनेश दाभाडे. मुख्याध्यापक. राजेंद्र नांगरे पाटील. साहित्यकार निलेश महिगावकर . चित्रकार मोहन जगताप व शालेय शिक्षण समितीचे सचिन जाधव शिक्षणप्रेमी उपस्थित होते....

माजी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती वनिता गोरे म्हणाल्या डॉ. महेश पालकर हे सातारा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षकांपासून ते शिक्षणाधिकारी व शिक्षण संचालक अशा प्रत्येक ठिकाणी केलेल्या कामातून उमटविलेला ठसा हा आपल्या आदर्श व कार्यकर्तृत्वाचा एक मैलाचा दगड असून त्यांच्या प्रामाणिकपणे कामाच्या पद्धतीतून एक आदर्श अधिकारी घडल्याचा सातारा जिल्हावासीय म्हणुन प्रत्येकाला अभिमान आहे.

यावेळी जिल्ह्यातील प्रत्येक घटकांनी शैक्षणिक कार्यात गुणवत्ता वाढीसाठी पालकांबरोबर इतरही घटकांनी सहभागी होवून आदर्श शिक्षणातून विद्यार्थी घडविण्याचे काम करावे असे सत्काराला उत्तर देताना डॉ. महेश पालकर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेखर सावंत यांनी केले तर प्रास्ताविक सागर खामकर यांनी केले. आभार अंकीत जगताप यांनी मानले चित्रकार मोहन जगताप यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला सातारा जावली तालुक्यातील शिक्षणप्रेमी उपस्थित होते मान्यवरांचे स्वागत सरपंच गणेश जगताप यांनी केले.

# अद्यावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणारा राजारामबापू पहिला साखर कारखाना

## प्रतिकदादा पाटील

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याने संपूर्ण देशात सर्वप्रथम आपल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे औषध फवारणी आणि मल्टी स्पेक्ट्रम ड्रोनसारखे अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. जगातील आधुनिक तंत्रज्ञान आपल्या शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचा माझा कायम प्रयत्न राहील, असा विश्वास राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, प्रतिकदादा पाटील यांनी व्यक्त केला.



वाळवा तालुक्या तील तांदुळवाडी, मालेवाडी, भरतवाडी, कणेगाव, बहादूरवाडी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद व संपर्क दौऱ्यात ते बोलत होते. यावेळी जेष्ठ संचालक प्रताप पाटील, शैलेश पाटील, हणमंत माळी, राजकुमार कांबळे, संचालिका डॉ.सौ. योजना शिंदे-पाटील, सचिव डी.एम. पाटील, बांधकाम अभियंता प्रेमनाथ कमलाकर, जलसिंचन अधिकारी जे.बी. पाटील, ऊस पुरवठा अधिकारी नितीन पाटील, गटाधिकारी संग्राम पाटील, विकास कदम या दौऱ्यात सहभागी झाले होते.

प्रतिक पाटील म्हणाले, लोकनेते राजारामबापू पाटील यांनी साखराळेच्या माळावर साखर कारखाना उभा करून वाळवा तालुक्याच्या विकासाला चालना दिली आहे. माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांनी साखर कारखान्याची प्रगती करताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित सातत्याने जपले आहे. गेल्या ५०-५५ वर्षापासून आपण व साखर कारखान्यात एक ऋणानुबंध निर्माण झाला आहे. तो जपण्याचा,वाढविण्याचा माझा अखंड प्रयत्न राहील.

यावेळी संचालक प्रताप पाटील, शैलेश पाटील, डॉ. योजना शिंदे-पाटील, तसेच नितीन पाटील यांनी माजी मंत्री आ. जयंतराव पाटील, प्रतिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्यावतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यां साठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या दौऱ्यात माजी संचालक भिमराव पाटील, माजी सभापती ॲड. विश्वासराव पाटील, बँकेचे संचालक संभाजी पाटील, जेष्ठ कार्यकर्ते बाजीराव पाटील, माजी सरपंच विलासराव देसावळे, बाजीराव बेनाडे, संग्रामसिंह घोरपडे, मंगेश माने, माजी सरपंच रमेश पाटील, राजाराम पाटील, मालेवाडीच्या सरपंच अस्मिता खवरे, उपसरपंच राहुल पाटील, अनिता गुरव, भरतवाडीच्या सरपंच सोनाली निकम, उपसरपंच धनश्री निकम यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मल्लू पाटीलची दादागिरी शिक्षणाधिकाऱ्यांना मारण्यासाठी उगारला हात

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी शिक्षण अधिकाऱ्यावर 'हात उचलल्याचे सीसी कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षण विभागात भीतीचे वातावरण असून पोलीस संरक्षण देण्याची मागणी होत आहे. माध्यमिक शिक्षण विभागात असे प्रकार वारंवार घडत आहेत. शिक्षणाधिकाऱ्यावर दबाव तंत्रासाठी असे कृत्य घडत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण आहे.

राजकीय दबावापोटी माझ्या फाइली अडवल्या जात असल्यामुळे संतापातून मी हे कृत्य केल्याचे मल्लिकार्जुन पाटील यांनी मान्य केले आहे

३० जून रोजी जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्याच्या कार्यालयात अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मल्लिकार्जुन पाटील यांनी गोंधळ घातला होता. आपल्या संस्थेतील शिक्षकांचे प्रस्ताव मंजुरीबाबत हेलपाटे मारून हे



काम होत नसल्यामुळे त्यांनी हा संताप व्यक्त केला अशी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्याच्या कार्यालयाला टाळे लावण्याचाही प्रयत्न केला होता. यावेळी शिक्षणाधिकारी जगताप हे न्यायालयीन कामासाठी बाहेर गेले होते . गोंधळाची माहिती मिळताच माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप हे कार्यालयात आले. यावेळी पाटील यांनी त्यांच्याबरोबर बराच वेळ वाद घातला. यानंतर बराच वेळ ते कार्यालयात बसून होते. शाब्दिक चकमकीवेळी ते शिक्षणाधिकाऱ्यांच्या अंगावर धावून गेल्याचे सीसी कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये दिसून आले आहे. या घटनेबाबत सदर बझार पोलीस ठाण्यात पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर पाटील हे पोलिसांसमोर हजर झाले असून चांगल्या वागणुकीच्या बॉण्डवर त्यांना जामीन देण्यात आला आहे. पोलिसांनी माध्यमिक शिक्षण विभागाला कार्यालयातील सीसी कॅमेऱ्याचे फुटेज मागितले होते. शिक्षण विभागाने हे फुटेज शुक्रवारी पोलिसांना सादर केले आहेत. सीसी कॅमेऱ्याच्या फुटेजमुळे पाटील यांचा पाय आणखी खोलात गेला आहे.

या घटनेनंतर पाटील यांच्या बाबतीत अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. स्वतःच्या शिक्षण संस्थेत ते स्वतः शिक्षक म्हणून नोकरी करतात. याचा पगारही ते उचलतात. शाळेवर शिकवण्यासाठी ते कधी गेले व तालुक्याच्या राजकारणाला कधी वेळ दिला, आता हा संशोधनाचा विषय झाला आहे. त्यांच्या संस्थेत करपे व स्वामी हे कर्मचारी काम करतात. ते कामावर येत नाहीत म्हणून त्यांचा पगार पाटील यांनी बंद केला आहे. याबाबत त्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केली आहे. तसेच यातील एकाने कर्नाटक सरकारकडून अनुदान घेऊन शाळा काढण्याचा प्रस्ताव दिला होता. अनुदान मिळाल्यानंतरही शाळा उभी केली नाही. कर्नाटक सरकारच्या पत्रानंतर तहसीलदारांनी संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध वसुलीची नोटीस बजावली आहे. कर्नाटक सरकारची १३ लाखाची वसुली आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून ही वसुली करण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने त्यांचा पगार चालू करण्याबाबत संस्थेला कळविले आहे. तरीही संस्थेने त्यांचा पगार काढलेला नाही. हे दोघेही शाळेत येत नाहीत त्यामुळे त्यांचा पगार काढणार नाही असे पाटील यांचे म्हणणे आहे. या वादामुळे शिक्षण विभागाने त्यांच्या संस्थेची पुढील कामे थांबविली आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही ही वसुली होत नसेल तर शाळेची मान्यता रद्द करण्याची पुढील कारवाई होणार आहे. अशी वस्तुस्थिती असताना कामासाठी पाटील यांनी दबाव तंत्राचा वापर केल्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शिक्षण अधिकाऱ्यापुढे एखाद्या शिक्षकाने गैरवर्तन करणे हे नियमबाह्य आहे.

# सण-उत्सवातून संस्कृती व राष्ट्रीय मूल्ये जोपासावी

## अरुण सांवत:चिंचणी (अं.) येथे आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा संपन्न

**कडेगाव/प्रतिनिधी:**

विद्यार्थ्यांना सण-उत्सव, परंपरा, संस्कृती यांची ओळख व्हावी, सामाजिक ऐक्य वाढावे व राष्ट्रीय मूल्यांची रुजवणूक व्हावी, यासाठी शाळेमार्फत असे उपक्रम राबविले जातात असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापक अरुण सांवत यांनी केले.

ते कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूल व क्रांतिवीरांगणा विजया काकू लाड प्राथमिक विद्यानिकेतन चिंचणी (अं) यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा आयोजित प्रसंगी बोलत होते.

या निमित्त माऊलींच्या पालखीचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक अरुण सावंत व चिंचणीचे वारकरी भजनी मंडळ ह.भ.प. महाराज पप्पु महाडीक, वृंदवाजक धनाजी आडके, अशोक पाटील फौजी,अशोक महाडीक, परशुराम मिरगे,दिपक माने, प्रकाश पाटील गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अभंग, भजन , रिंगण सोहळा , फुगडी ,पालखी दिंडी, अभंग तालावर स्केटिंग व फुगडी ठेका पाचवीच्या मुलींनी धरला होता. तसेच विद्यार्थ्यांनी अभंग, रखुमाई रखुमाई, माऊली- माऊली अशी गीते सादर केली . यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. माऊलींच्या पालखीचे गावात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात भक्ती भावाने पूजन व्हायचे! यामुळे साक्षात प्रति पंढरपूर निर्मिती झाली होती.चिमुकल्या वारकऱ्यांनी टाळ, मृदुंगाच्या गजरात सहभाग घेत विठुरायाच्या चरणी भक्तिभाव व्यक्त केला. पावसाची तमा न बाळगता विद्याव्यांचा उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय होता. विविध संतांचे पोशाख, अभंग,ओव्या, भजन सादर करत विद्यार्थ्यांनी संत परंपरेचे दर्शन घडवले. माऊली माऊली या गीतावर रंगवलेला नृत्याविष्कार प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून गेला.

यावेळी चिंचणीतील जि.प.शाळा, प्राथमिक आणि माध्यमिक च्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी यांच्या हुबेहूब वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या दिंडीमध्ये चिंचणी मधिल जि.प.शाळा अंगणवाड्या यांचाही सहभाग करून घेण्यात आला. ग्रामपंचायती समोर भव्य रिंगण सोहळा पार पाडला.हा सोहळा पाहण्यासाठी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विठुरायाच्या नामघोषात महिला वर्गाने, विद्यार्थिनींनी फुगडी चा फेर धरला...

हा संपूर्ण दिंडी सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक अरुण सावंत, पर्यवेक्षक सतीश मेटकरी, सांस्कृतिक विभाग प्रमुख एल.डी.पालवी,सौ. व्ही. व्ही. लाड यांनी नियोजन केले. सुत्रसंचलन राहुल कुंभार यांनी केले तर आभार वाय.शिकलगार यांनी मानले .यावेळी ज्येष्ठ शिक्षक उमाकांत सावंत तसेच चिंचणीतील जि.प.शाळा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी, भजनी मंडळातील वारकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.



चिंचणी (अं.) येथे आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा प्रसंगी चिमुकले बालक, विद्यार्थी, शिक्षक, वारकरी, ग्रामस्थ समवेत (छाया:सुमित रिटनकर )

# इस्लामपूर तहसिलदार कार्यालयातील आधार कार्ड सेवा केंद्र तातडीने सुरू करावे

## युवक राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची मागणी

**इस्लामपूर : प्रतिनिधी:**

इस्लामपूर तहसिलदार कार्यालयातील आधार कार्ड सेवाकेंद्र तातडीने सुरू करून इस्लामपूर व तालुक्यातील नागरिकांची गैर सोय थांबवावी, अशी मागणी इस्लामपूर शहर युवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली. निवासी नायब तहसिलदार श्रीमती प्रज्ञा कांबळे-इंगळे यांना शहर सरचिटणीस अभिजित रासकर यांच्या हस्ते मागणीचे निवेदन देण्यात आले.

इस्लामपूर तहसिलदार कार्यालयात आधार कार्ड सेवा केंद्र आहे. या केंद्रातून आधार कार्ड बाबतच्या सर्व सेवा दिल्या जातात. मात्र काही दिवसांपासून हे सेवा केंद्र बंद आहे. त्यामुळे इस्लामपूर शहर व वाळवा तालुक्यातील नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी आपण लक्ष घालून हे सेवा केंद्र तातडीने सुरू करावे, असे निवेदनात म्हंटले आहे.



इस्लामपूर येथे निवासी नायब तहसिलदार श्रीमती प्रज्ञा कांबळे-इंगळेयांना निवेदन देताना युवक सरचिटणीस अभिजित रासकर. समवेत युवक शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, उपाध्यक्ष अभिजित कुर्लेकर, अजय खवळे, प्रशांत यमगर, शिवाजी कदम, राजेंद्र कुलकर्णी व युवा कार्यकर्ते

याप्रसंगी युवक शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, उपाध्यक्ष अभिजित कुर्लेकर, सोशल मिडिया शहराध्यक्ष अभिमन्यू क्षिरसागर, विकास चव्हाण, सागर पोतदार, राजेंद्र कुपकर्णी, अजय खवळे, अमित साळुंखे, प्रशांत यमगर, आकाश पाटील, शिवाजी कदम, अनुज दाभाडे, आकाश खवळे, अतिक मणेर प्रामुख्याने उपस्थित होते.

# नाडे येथील रघुकुल विद्यालय रंगला भव्य दिंडी सोहळा

**मल्हारपेठ/प्रतिनिधी : -**

नाडे, ता. पाटण येथील रघुकुल विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी पायी दिंडी सोहळा काढून वारकरी संप्रदायाच्या अनोख्या सोहळ्याचा आनंद लुटला. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा जयघोष करीत हा दिंडी सोहळा विद्यालयाच्या प्रांगणातून सुरु होऊन नवारस्ता येथील विठ्ठल मंदिरात त्याची सांगता झाली.

यावेळी दिंड्या पताका नाचवत, तसेच विठ्ठल रखुमाईचे आणि वारकऱ्यांचे वेश धारण केलेले विद्यार्थी यामुळे या वारकरी सांप्रदायाच्या अनोख्या भक्ती सोहळ्याचे सर्वांना दर्शन झाले.

नाडे येथे सुयश मेडिकल अँड चॅरिटेबल ट्रस्ट संचलित रघुकुल विद्यालय विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देण्याचे काम करीत असून पाटण तालुक्यात या विद्यालयाचा नावलौकिक कायम आहे. या विद्यालयात पाटण तालुक्याच्या विविध भागातून विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येत असतात. या विद्यालयात शालेय शिक्षणाबरोबर सण-उत्सव त्याचबरोबर विविध सामाजिक धार्मिक परंपरा यांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी विविध उपक्रम नियमितपणे राबवली जातात. त्याचाच एक भाग म्हणून या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशीच्या निमित्ताने पायी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता.

रघुकुल विद्यालयात बाल मंदिरापासून ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असणारा आषाढी एकादशीच्या निमित्ताने भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी, विद्यालयाच्या प्रांगणात संस्थेच्या सचिव डॉ. सौ. रुपाली देसाई व प्राथमिक, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका व शिक्षक वर्ग यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

यावेळी अध्यात्मिक क्षेत्रातील पालक ह. भ. प. रामचंद्र उदूगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दिंडीत चालल्याने तन तंदुरुस्त राहते, तर मुखी माऊलीचे नाम घेण्याने मन निर्मळ राहते. त्यामुळे दिंडीत तन-मन हरपून सहभागी झाले पाहिजे, तरच दिंडीत सामील झाल्याचे सुख मिळेल. त्याचबरोबर संतांनी दिलेले विचार आचरणात आणले पाहिजेत.

पावसाची रिमझिम सुरू असताना देखील विद्यालयाचा भव्य दिंडी सोहळा विद्यालयाच्या प्रांगणातून सुरू होऊन याची सांगता नवारस्ता येतील विठ्ठल रखुमाई मंदिरात झाली. यावेळी विविध वेशभूषा धारण केलेले विद्यार्थी हातात रंगीत पताका घेऊन ज्ञानोबा माऊलीचा जय घोष निघालेल्या दिंडी सोहळ्याचे चित्र खूपच विलोभनीय होते.



# वडगाव हवेली येथील प्राथमिक शाळेत दिंडीचे आयोजन

**तांबवे/प्रतिनिधी : -**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून वडगाव हवेली, ता. कराड येथील यशवंत शिक्षण संस्थेचे प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या दिंडीमधील पालखी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज ग्रंथाचे पुजन यशवंत शिक्षण संस्थेचे संस्थापक संचालक जे. क. जगताप, उद्योगपती सुहास जगताप, माजी उपसरपंच राजेंद्र थोरात गामपंचायत सदस्य प्रशांत काटवटे, सत्वशिल जगताप, सागर मदने, डी. पी. पवार यांनी कले. दिंडीमध्ये वेशभुषेतील विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम महाराज, तुलसी वृंदावन घेतलेल्या मुली यांनी गावकऱ्यांचे लक्ष बेधून घेतले. 'साक्षर जनता भूषण भारता, शिकलेली आई घर पुढे नेईल', अशा पाट्या असलेले बोर्ड हाती घेऊन निरक्षरांना साक्षरतेचा संदेश या दिंडीमधून देण्यात आला.



तसेच ग्रामपंचायतीसमोर सरपंच राजेंद्र जगताप, अशोक जगताप यांनी दिंडीचे स्वागत केले. यावेळी गामपंचायत सदस्य, कर्मचारी उपस्थित होते. ग्रामपंचायत प्रांगणात रिंगण सोहळा, झिमा-फुगडी हे खेळ घेण्यात आले. गावातून वाद्यासह पालखीची मिरवणूक काढण्यात आली. या दिंडी सोहळ्याचे नियोजन एन.एस. पोळ, एम.एस सकटे, एम.एस. पाटील, एस.एम. आवटी, एन.एस. कराळे, एल.जे. कुंभार, ए.एल. लोकरे, अश्विनी सांळुखे, व्ही.एच. कदम, एम.डी. पाटील, अब्दुल मुल्ला, शिवाजी चव्हाण यांनी सहकार्य केले.



कराड : पालकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली वारकरी व वृक्षदिंडी.

# हजारमाची येथील माध्यमिक विद्यालयात दिंडी सोहळ्याचे आयोजन

**तांबवे/प्रतिनिधी:-**

सदाशिवगड हजारमाची ता कराड येथील यशवंत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालयात आषाढी दिंडी सोहळा उत्साहात पार पडला.

माध्यमिक विद्यामंदिर सदाशिवगड शाळेत आषाढी दिंडीचे आयोजन केले होते.संस्थेचे सचिव डी. ए. पाटील सर तसेच प्राथमिक विद्यामंदिर वडगाव हवेली चे मुख्याध्यापक दिपक पवार, मुख्याध्यापिका मनिषा पानवळ उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव डी. ए. पाटील यांच्या हस्ते पालखीचे पूजन केले. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात रिंगण सोहळा घेण्यात. यावेळी विद्यार्थीनींनी झिम्मा, फुगडी हे खेळ घेण्यात आले.

यानंतर हजारमाची गावातून दिंडी गावातील ज्योतिबा मंदिर या ठिकाणी गेली सर्व विद्यार्थ्यांनी अनेक अभंग भक्तीपर गीते सादर केली दिंडीचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा पानवळ, शिक्षक शशिकला पोळ ,अंजली पाटील, सुवर्णा शिनगारे, , जगताप मॅडम, तसेच तानाजी राजमाने, सुरेश वेताळ , संजय गोसावी यांनी नियोजन केले. वसंत मोहिते, चंद्रकांत डुबल, अशोक मोरे , ओंकार रांगोळे या सर्वांनी सहकार्य केले अशाप्रकारे आषाढी दिंडी उत्साह पूर्ण वातावरणात आनंदात पार पडली.



# पालकर शाळेची विद्यार्थी वारकरी दिंडी व वृक्षदिंडी

**कराड/प्रतिनिधी : -**

शहरातील सोमवार पेठ (पंताचा कोट) येथील (कै.) काशिनाथ नारायण पालकर आदर्श विद्यालयाची विद्यार्थी वारकरी दिंडी व वृक्षदिंडी उत्साहात संपन्न झाली. संस्थेचे सहसचिव प्रकाश खोचीकर व संचालक नंदकुमार कालवडेकर, मुख्याध्यापिका वर्षाराणी पवार यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

शाळेच्या प्रांगणातून दिंडीची सुरुवात झाली. बालवाडीचे विद्यार्थी विठ्ठल - रुक्मिणी व वारकऱ्यांच्या वेशात दिंडीत सहभागी झाले होते. तसेच पर्यावरण जागृतीसाठी पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांच्या वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. कराड शहरातील मुख्य रस्त्याने दिंडी निघून ह.भ.प. मारुतीबुवा कराडकर मठात पोहोचली. तिथे विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. संस्थेचे अध्यक्ष व आनंदराव पालकर, सचिव सुरेखाताई पालकर, उपाध्यक्ष विठ्ठलराव शिखरे, जयवंतराव पालकर, संचालिका राजश्री पालकर, वैशाली पालकर, बाजीराव शेवाळे, चंद्रशेखर खेडेकर, मोहन वराडकर, अनंतप्रसाद पावसकर यांनी सर्व विद्यार्थी वारकऱ्यांचे स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

विद्यार्थ्यांनी ढोलाच्या तालावर लेझीम प्रात्यक्षिके केली व टाळांच्या गजराच्या नादात विठ्ठल भक्तीगीत सादर केले. त्यानंतर शुक्रवार पेठेतून दिंडी पुन्हा शाळेत आली. सर्वांच्या सहकार्याने अतिशय उत्साही वातावरणात वारकरी दिंडी व वृक्षदिंडी संपन्न झाली.



कामेरी : विद्यार्थी दिंडीचा शुभारंभ करताना मुख्याध्यापक दिलीप चरणे, उमेश जाधव, शिवाजी गुरव, अनुराधा पेडणेकर, सुवर्णा यादव, समक्षा पाटील, धनंजय पाटोळे.

# कामेरीत विद्यार्थी वारकरी दिंडी उत्साहात

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**

कामेरी (ता. वाळवा) येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे विद्यालय व छगनबापू पाटील गर्ल्स हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि. ५) रोजी राज्याचे आराध्य दैवत पांडुरंगाचे स्मरण करत विद्यार्थी वारकरी दिंडी 'रामकृष्ण हरी'च्या नामघोषात संपन्न झाली.

सर्वप्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक डी.एल.चरणे यांनी वारकरी संप्रदायाची संस्कृती व त्याची जोपासना याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. मुला - मुलींनी वारकरी पेहरावमध्ये पावसाची तमा न बाळगता ग्रामदैवत श्री हनुमानाच्या पवित्र प्रांगणात रिंगण व फुगड्या घातल्या. सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती ए. डी. पेडणेकर यांच्या आयोजनाखाली, दोन्ही मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. गुरुदेव कार्यकर्ते डी. बी. पाटोळे, यु. बी जाधव, सौ. एस. आर. यादव, सौ. एस. एम. पाटील, शिवाजी गुरव, हर्षवर्धन साळुंखे, कांबळे सर, सौ. रूपाली टेके, सौ. किरण पवार, राजेंद्र जेडगे, माणिक माने, सर्जेराव जगताप यांच्या सहकार्याने भक्तिमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

# आत्माराम विद्यामंदिरात विद्यार्थ्यांची आषाढीवारी दिंडी उत्साहात साजरी

**कराड/प्रतिनिधी : -**

शिक्षण मंडळ, कराड संचालित आत्माराम विद्यामंदिर ओगलेवाडी येथे विद्यार्थ्यांची आषाढीवारी दिंडी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी साकारलेली संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, विठ्ठल-रखुमाई व पारंपारिक वेशभूषा केलेला पेहराव हे या दिंडीचे वैशिष्ट्य होते.

'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल', तसेच 'ज्ञानोबा माऊली व तुकाराम'च्या नाम गजरात विद्यार्थ्यांनी हातात टाळ घेऊन वातावरण भक्तिमय केले होते. ही दिंडी शाळेपासून हजारमाची गावातील जोतिबा मंदिर, ओगलेवाडी बस स्थानक व परत शाळेपर्यंत काढण्यात आली.



विद्यार्थ्यांनी रिंगण करून फुगड्या खेळत प्रतिपंढरपूर निर्माण केले होते. विद्यार्थ्यांच्या फुगडीमुळे वातावरण अधिकच चैतन्यमय झाले होते. टाळ मृदुंगाचा जयघोष व भगव्या पताका शोभून दिसत होत्या. बाजारपेठेतील नागरिक व ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

यावेळी दिंडीबरोबर पर्यवेक्षक शरद सूर्यवंशी, सह. पर्यवेक्षक जयश्री शेंडगे, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. संस्कृती व भक्तीचा मिलाप झाल्याचे यावेळी दिसून आले.



# चिंचणीतील जिल्हा परिषद शाळेत वसंतराव नाईक जयंती साजरी

**कडेगाव/प्रतिनिधी : -**

चिंचणी, ता. कडेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे जनक, पहिले शेतकरी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालय रेठरे बुद्रकच्या विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा राबवल्या. त्याचबरोबर वृक्षदिंडी चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देण्यात आले.

# हणमंतनगरनगर आषाढी दिंडीचे आयोजन

**कडेगाव/प्रतिनिधी : -**

'पाऊले चालती पंढरीची वाट.. ज्ञानोबा तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय', अशा जय घोषामध्ये आज आषाढी एकादशी निमित्त वारकरी वेशातील बालचमू, श्री विठ्ठल वेशातील प्रशालेचा अर्णव पाटील, रुक्मिणी वेशातील ईश्वरी महाडीक, कोणी टाळ घेतले, कोणी मृदंग कपाळावरती गोपीचंदनाचा टिळा लावून मोठ्याने जयघोष करीत बाल वारकरी यांनी दिंडी उत्साहात पार पाडली.



या कार्यक्रमासाठी सर्व पालकांचे सहकार्य लाभले. तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. माया कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली सहायिका सौ. शामबाला महाडीक व सहाय्यक शिक्षक रामलिंग खाडे यांनी सहकार्य करून कार्यक्रम उत्कृष्ट रित्या पार पाडला. यावेळी प्रशाला शाळा समितीचे अध्यक्ष संजय महाडिक, कृष्णत जाधव, इतर सदस्य व पालक उपस्थित होते.



**आषाढीवारी निमित्ताने सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभाग शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी बाळचमू गावोगावी टाळ मृदुंगाच्या तालावर ठेका धरून विठ्ठल नामाच्या गजरात तल्लीन दिंडी सोहळा साजरा केला. भणंग ता.जावली येथील या सोहोळ्याचे मोहन जगताप यांनी टिपलेले छायाचित्र.**

## अक्कलकोटच्या मौलाली गल्लीत परंपरेनुसार यंदाही

# मौलाली साहेब, नालेहैदर,गैबी साहेब पंजांचे अग्नि तुडवण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

अक्कलकोट मौलाली गल्ली येथे परंपरेनुसार यंदाही मौलाली साहेब,नालेहैदर,गैबी साहेब पंजांचे अग्नि तुडवण्यात कार्यक्रम शेकडो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला

यावेळी अग्निप्रज्वलासाठी मौलाली गल्ली पंच कमिटी कडून अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष मलिकार्जुन पाटील, एपीआय भागवत साहेब यांना आमंत्रित केले होते. व त्यांनी हा आमंत्रण स्वीकार करून मौलाली पंजे दर्शनासाठी व अग्निप्रजालासाठी रात्री १०:०० वाजता मौलाली गेली येथे उपस्थित राहिले व मौलाली साहेब, नालेहैदर, गैबी साहेब मोहरम पंजांचे दर्शन घेतले, दर्शन घेताच मौलाली गल्ली मोहरम पंच कमिटी कडून मलिकार्जुन पाटील व ए.पी.आय भागवत साहेब यांचा शाही फेटा शाल पुष्पहार घालून व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला,

त्यासोबतच मौलाली मोहरम कमिटीचे माजी अध्यक्ष गालिब काजी, माझी मिरवणूक प्रमुख सत्तार पठाण, माजी नगरसेवक व मिरवणूक प्रमुख सुनील सिद्धे,गणी पठाण,आलम खिस्तके,मौलाली गल्ली मोहरम कमिटीचे खंबीर साथ सद्दाम शेरीकर, युसुफ बागलकोटे,व मौलाली मोहरम अध्यक्ष अश्फाक खिस्तके,उपाध्यक्ष इरफान ताची कॅशियर बबु खिस्तके, तसेच सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, सामाजिक कार्यकर्ते रशीद खिस्तके यांचाही मलिकार्जुन पाटील व ए.पी.आय भागवत साहेब प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या अग्नी तुडवण्याच्या कार्यक्रमाला हिंदूमुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. अग्नि तुडवण्याच्या कार्यक्रम उत्तम नियोजन मौलाली गल्ली यंग कमिटी कडून करण्यात आला होता.



यावेळी सोहेल फरास,रशीद खिस्तके,मुक्तार शेख,महमद पठाण, शब्बीर सुभेदार, हननु चाबुकस्वार, निजाम खिस्तके,मोईन खिस्तके, अत्तर शेरीकर, युसुफ बागलकोट, गणी पठाण,सत्तर पठाण, मुकतार फरास, अख्तर शेरीकर, मौलाली गल्ली यंग कमिटी व पंच कमिटी यावेळी उपस्थित होते. अग्नि तुडवण्याचा कार्यक्रम हा मोठ्या उत्साहात संपन्न झाला


## गोल्डन विकली चान्स

| | मिलनम (उदय/ अस्त) | | | कल्याणम (उदय/अस्त) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सोम. | 3 120 346 337 | 9 126 469 144 | 7 124 467 133 | 6 150 169 114 | 2 345 390 336 | 0 190 280 244 |
| | 13-30 | 89-95 | 47-76 | 36-65 | 12-29 | 40-08 |
| मंगळ | 7 160 250 890 | 5 140 230 780 | 1 128 146 119 | 0 145 235 550 | 1 146 470 344 | 7 124 278 700 |
| | 07-74 | 35-59 | 81-12 | 30-09 | 21-15 | 67-78 |
| बुध | 9 180 289 388 | 6 150 169 330 | 2 246 156 110 | 2 129 480 110 | 8 125 408 440 | 5 230 780 500 |
| | 39-90 | 16-64 | 52-29 | 42-21 | 38-80 | 95-57 |
| गुरू | 6 240 268 600 | 1 236 380 335 | 3 230 490 670 | 7 160 250 133 | 6 240 268 330 | 3 120 139 490 |
| | 56-69 | 71-10 | 23-34 | 07-71 | 26-64 | 93-35 |
| शुक्र | 2 246 480 660 | 7 278 467 244 | 0 280 460 244 | 3 238 580 396 | 2 156 129 200 | 0 190 280 244 |
| | 62-23 | 97-75 | 40-08 | 63-34 | 92-28 | 40-07 |
| शनि | 0 145 235 550 | 9 270 180 450 | 3 120 346 670 | 1 216 470 560 | 8 125 269 224 | 9 270 150 144 |
| | 10-04 | 29-98 | 63-35 | 71-12 | 48-80 | 39-95 |

गोल्डन चान्स तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# ठाकरे बंधूंचे मनोमिलन ; राज्याच्या राजकारणात नवे पर्व

मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू एकवटले आणि ते उभ्या महाराष्ट्राने पाहिले, तब्बल वीस वर्षानंतर हे दोन भाऊ एका ठिकाणी आले, महाराष्ट्रातील अनेक जणांची इच्छा पूर्ण झाली. आगामी राजकारणात त्यांची संकेत पाहायला मिळतील 'ठाकरे बँड' संपला अशी अवयी उठवणाऱ्यांच्या पदरी निराशा आली, दोन भावांची एन्ट्री आणि समर्थकाने केलेला जल्लोष हा ऐतिहासिक क्षण होता, ते दोघे व्यासपीठावर बसलेले दोघांची भाषणामध्ये समान मांडणी, एक आक्रमक तर एक सौम्य अशी रुपे आज पाहायला मिळाली ठाकरे यांनी मराठीचा मुद्दा घेतला असला तरी त्यांचे पुन्हा मनोमिलन झाले, अनेक शिवसैनिकांनी व मनसैनिकांनी आज पर्यंत या क्षणासाठी अनेक वर्ष वाट पाहिली तो क्षण आज पूर्ण झाला, या दोघांच्या मनोमिलनाने महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवे पर्व सुरू झाले आहे महापालिकेच्या निवडणुकीनिमित्त ते लोकांच्या समोरही येईल, दोघांनी आपल्या भाषणामध्ये एकीचा संकेत दिला किंबहुना आगामी महापालिकेच्या निवडणुकीची रणनीती काय असेल ते दाखवून दिले.



५ जुलै २०२५ हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक महत्वाचा दिवस म्हणून गणला जाईल. तब्बल दोन दशकांनंतर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतील वरळी येथील 'एनएससीआय डोम'मध्ये एकाच मंचावर येऊन मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी एकजुटीचे प्रदर्शन केले. 'आवाज मराठिचा' या विजय रॅलीच्या निमित्ताने हे पुनर्मिलन घडले, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी एकत्र आलेले ठाकरे बंधू भविष्यातील राजकीय रणनीतीत काय बदल घडवू शकतात? त्यांच्या या एकजुटीमुळे सामान्य मराठी माणसाला काय फायदा होईल आणि कोणती आव्हाने समोर येतील? या सगळ्या विषयांना आता तोंड फुटले आहे.

उद्धव आणि राज ठाकरे यांचे पुनर्मिलन ही केवळ भावनिक घटना नाही, तर त्यामागे खोल राजकीय आणि सामाजिक कारणे आहेत. सर्वप्रथम, महाराष्ट्र सरकारच्या त्रिभाषा धोरणाविरोधातील यशस्वी आंदोलनाने या दोघांना एका मंचावर आणले. राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणात हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडला होता, ज्याला मराठी भाषा आणि संस्कृतीवर आघात म्हणून पाहिले गेले. या धोरणाविरोधात उद्धव आणि राज यांनी एकत्रितपणे आवाज उठवला, आणि सरकारला हा प्रस्ताव मागे घ्यावा लागला. हा विजय मराठी अस्मितेचा प्रतीकात्मक विजय ठरला, ज्याने ठाकरे बंधूंना एकत्र येण्यासाठी एक सामाईक व्यासपीठ दिले.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे बदलते राजकीय वास्तव. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला २०२२ मध्ये पक्षफुटीचा मोठा धक्का बसला, ज्यामुळे त्यांची राजकीय ताकद आणि प्रभाव कमी झाला. दुसरीकडे, राज ठाकरे यांच्या मनसेला गेल्या काही वर्षांत निवडणुकांमध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. दोघांनाही आपापल्या पक्षाच्या मर्यादांची जाणीव झाली आहे, आणि मराठी माणसाच्या मतांचे विभाजन त्यांच्यासाठी घातक ठरत आहे. अशा परिस्थितीत, मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर एकत्र येणे हे त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते.

तिसरे कारण आहे मराठी माणसाची भावनिक जोड. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली शिवसेना आणि त्यांचा मराठी अस्मितेचा वारसा हा दोन्ही नेत्यांच्या राजकारणाचा पाया आहे. मराठी माणसाच्या मनात ठाकरे कुटुंबाबद्दल आजही आदर आहे, आणि त्यांच्या एकत्र येण्याने ही भावनिक शक्ती पुन्हा एकदा जागृत होऊ शकते.

देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपने घातलेला हैदोस हे देखील या पुनर्मिलनाचे एक महत्वाचे कारण आहे. सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत राज ठाकरे यांनी भाजपविरोधात आक्रमक निशाणा साधला होता. पण राज यांच्या त्यानंतरच्या बदलत्या भूमिकांमूळे त्यांच्या चाहत्या वर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. उद्धव मात्र भाजपशी थेट फारकत घेऊन त्यांच्या एकाधिकाराशीही, मतलबी राजकारणाविरुद्ध आक्रमकपणे लढत राहिले. त्रिभाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाने दोन्ही ठाकरे बंधूंच्या मनातील भाजपविरोधी असंतोषाला एकत्रित वाचा फोडण्याचे निमित्त मिळाले.

उद्धव आणि राज ठाकरे यांचे राजकीय मार्ग २००५ मध्ये वेगळे झाले, जेव्हा राज यांनी शिवसेना सोडून २००६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) स्थापन केली. या फुटीमागे नेतृत्व आणि विचारधारेचे मतभेद होते. राज ठाकरे यांना शिवसेनेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी पुरेशी संधी मिळत नसल्याची भावना होती, तर उद्धव ठाकरे यांना बाळासाहेबांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी होती.

२००६ नंतर, दोघांनी स्वतंत्रपणे आपली राजकीय वाटचाल सुरू केली. उद्धव यांनी शिवसेनेचे नेतृत्व करताना २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन करून सत्तेचा अनुभव घेतला, तर राज यांनी मनसेच्या माध्यमातून मराठी अस्मितेचा आणि स्थानिक हक्कांचा मुद्दा उचलला. मात्र, राज यांच्या मनसेला निवडणुकांमध्ये सातत्याने मर्यादित यश मिळाले, आणि त्यांचा प्रभाव प्रामुख्याने शहरी भागांपुरता मर्यादित राहिला.

या काळात दोघांनी एकमेकांवर टीका केली, आणि त्यांच्या समर्थकांमध्येही वैमनस्य निर्माण झाले. उद्धव यांनी शिवसेनेला अधिक समावेशक आणि राष्ट्रीय स्तरावरील राजकारणात सक्रिय करण्याचा प्रयत्न केला, तर राज यांनी मराठी माणसाच्या हक्कांसाठी आक्रमक भूमिका घेतली. या मतभेदांमुळे ठाकरे कुटुंबातील ही फूट मराठी जनतेच्या मनातही खटकत होती.

ठाकरे बंधूंच्या पुनर्मिलनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल घडण्याची शक्यता आहे. सर्वप्रथम, शिवसेना (उबाठा) आणि मनसे यांच्यातील संभाव्य युतीमुळे मराठी मतांचे विभाजन थांबू शकते. याचा थेट परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत, विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीत दिसू शकतो. 'बीएमसी'वर शिवसेनेची दीर्घकाळ सत्ता होती, आणि उद्धव-राज यांच्या एकजुटीमुळे ही सत्ता पुन्हा मिळवण्याची शक्यता वाढली आहे.

दुसरे, महाविकास आघाडी (मविआ) च्या समीकरणांवर याचा परिणाम होऊ शकतो. उद्धव ठाकरे यांचा पक्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत 'मविआ'चा भाग आहे, पण राज ठाकरे यांचा समावेश झाल्यास काँग्रेससारख्या पक्षांना आपली रणनीती पुन्हा आखावी लागेल. काही विश्लेषकांच्या मते, राज यांचा समावेश 'मविआ'ला अधिक आक्रमक आणि मराठी-केंद्रित स्वरूप देऊ शकतो, परंतु यामुळे काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षांशी मतभेदही निर्माण होऊ शकतात.

तिसरे, भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला या एकजुटीमुळे आव्हान निर्माण होऊ शकते. ठाकरे बंधूंनी मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर भाजप आणि शिंदे गटावर आक्रमक टीका केली आहे, आणि यामुळे मराठी मतदारांमध्ये त्यांचा प्रभाव वाढू शकतो. विशेषतः, शिंदे गटाला मराठी माणसाच्या हक्कांसाठी कमी आक्रमक मानले जाते, ज्याचा फायदा ठाकरे बंधूंना मिळू शकतो.

महाराष्ट्रासमोर अनेक आव्हाने आहेत, ज्यांचा सामना करण्यासाठी ठाकरे बंधूंना ठोस धोरणे आखावी लागतील.

(१)मराठी भाषा आणि संस्कृतीचे संरक्षण: त्रिभाषा धोरणाच्या विरोधातून सुरू झालेल्या या एकजुटीने मराठी भाषेच्या संरक्षणाला प्राधान्य दिले आहे. यासाठी *शालेय अभ्यासक्रमात मराठी भाषेला अनिवार्य करणे, मराठी साहित्य आणि कला यांना प्रोत्साहन देणे, आणि मराठी माध्यमाच्या शाळांना आर्थिक आणि पायाभूत सुविधांचा आधार देणे आवश्यक आहे.

(२) स्थानिक रोजगार आणि हक्क: मराठी माणसाला स्थानिक नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे, हा राज ठाकरे यांचा दीर्घकाळचा मुद्दा आहे. यासाठी औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात *स्थानिकांना आरक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम, आणि बाहेरील राज्यांतील स्थलांतरितांच्या बाबतीत धोरणात्मक नियंत्रण* आवश्यक आहे.

(३) पायाभूत सुविधा आणि शहरीकरण: मुंबई आणि इतर महानगरांमधील पायाभूत सुविधांचा अभाव, वाहतूक कोंडी, आणि पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करणे गरजेचे आहे. 'बीएमसी'च्या माध्यमातून मुंबईच्या विकासासाठी ठोस योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे* आवश्यक आहे.

(४)शेती आणि ग्रामीण विकास: महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रश्न, विशेषतः *कर्जमुक्ती, पिक विमा, आणि बाजारपेठेतील सुधारणा*, यावर लक्ष देणे गरजेचे आहे. *ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी* उपलब्ध करून देण्यासाठी धोरणे आखावी लागतील.

उद्धव आणि राज ठाकरे यांनी मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे, परंतु त्यांच्या दृष्टिकोनात काही फरक आहे. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या नेतृत्वाखाली मराठी अस्मितेसोबतच राष्ट्रीय राजकारणात समावेशक दृष्टिकोन स्वीकारला. २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत युती करून त्यांनी सत्तेचा अनुभव घेतला, आणि मराठी माणसाच्या हक्कांसोबतच सामाजिक समावेशकतेवर भर दिला.

दुसरीकडे, राज ठाकरे यांनी मनसेच्या माध्यमातून मराठी माणसाच्या हक्कांसाठी अधिक आक्रमक आणि स्थानिक-केंद्रित दृष्टिकोन स्वीकारला. त्यांनी हिंदी भाषेच्या अनिवार्यतेचा आणि बाहेरील स्थलांतरितांचा मुद्दा वारंवार उचलला, ज्यामुळे त्यांना शहरी मराठी तरुणांमध्ये लोकप्रियता मिळाली, पण त्यांच्या पक्षाला व्यापक यश मिळाले नाही.

या पुनर्मिलनात दोघांनी मराठी अस्मितेच्या संरक्षणावर एकमत दर्शवले आहे. उद्धव यांनी आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत असे सांगून युतीचे संकेत दिले, तर राज यांनी हिंदीच्या अनिवार्यतेवर टीका करत मराठीच्या रक्षणाचा संकल्प व्यक्त केला.

## आदर्श प्राथमिक विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : -**

श्री. मळाईदेवी शिक्षण संस्थेचे आदर्श प्राथमिक विद्यालय व आदर्श शिशुविहार, मलकापूरमध्ये शुक्रवार, दि. ४ रोजी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बाल वारकऱ्यांची आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांनी ही दिंडी काढण्यात आली. हणमंतराव पवार, मलकापूर यांच्या हस्ते माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढवून दिंडी सोहळ्यास प्रारंभ झाला.



दिंडीमध्ये आदर्श प्राथमिक विद्यालय व आदर्श शिशुविहार विभागाचे विद्यार्थी संतांच्या वेशभूषा करून उत्साहाने सहभागी झाले होते. अवघ्या महाराष्ट्राचे दैवत पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाला संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज व महाराष्ट्रातील संतांच्या पालख्या आळंदी देहू पासून ते महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून पंढरपूरला जातात. वारीची ही संत परंपरा, महाराष्ट्राची संस्कृती विद्यार्थ्यांना समजावी, तसेच प्रत्यक्ष वारीचा अनुभव यावा, याकरिता सदर दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाच्या प्रांगणातून ज्ञानोबा तुकारामच्या जयघोषात, टाळ मृदुंगाच्या गजरात वाजत गाजत या दिंडीचे प्रस्थान करण्यात आले. हरिनामाच्या गजरात पालखी मलकापुरातून विविध भागातून निघाली. ठिकठिकाणी पालखीचे स्वागत व पूजन करण्यात आले. यामध्ये मुले व मुली संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, जनाबाई, नामदेव, सोपानदेव, मुक्ताई यांची वेशभूषा करून सहभागी झाले होते. टाळ मृदुंगाच्या साथीने संपूर्ण परिसरात पहावा विठ्ठल, बोलावा विठ्ठल असे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच वारकरी, टाळकरी, विणेकरी, पताकेवाले अशा अनेक वेशभूषा परिधान केलेल्या चिमुकल्यांनी धरलेला ठेका मन आनंदून सोडत होता. दिंड्या, पताका हातात नाचवीत विठुरायाचा व ग्यानबा तुकारामचा गजर करत पालखी काढण्यात आली. विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता.

या दिंडीतून धार्मिक संदेशाबरोबर पर्यावरण संवर्धन करण्याचा संदेश देत 'झाडे लावा झाडे जगवा', लेक वाचवा' अशा घोषणा देण्यात आल्या. त्याचबरोबर अवयवदान, स्त्रीभ्रूणहत्या, 'पाणी वाचवा, पाणी जिरवा' या प्रकारचे संदेश दिंडीच्या माध्यमातून देण्यात आले. हा दिंडी सोहळा बघण्यासाठी अबालवृद्धांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी केली होती. तसेच संचालक मंडळाचे सदस्य वसंतराव चव्हाण, तसेच पथक पर्यवेक्षण प्रमुख आर.ए. कुंभार दिंडी सोहळ्यास उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका सौ. स्वाती थोरात, सौ. सविता कोळी, हरिदास माने, अभिजीत गायकवाड, संभाजी वैरी, गणोजी जाधव, बंडा काकडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी दिंडीचे नियोजन केले. एच.डी. शिर्के, डी.आर. शिर्के, जय पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सोनाली थोरात यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना गोड खीर खाऊ घालून दिंडी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

### भारती विद्यापीठ अभिजीत कदम प्रशाला, जुनिअर कॉलेज व व्यवसाय शिक्षण

## अमरापूर येथे आषाढी एकादशीनिमित्त रंगला दिंडी व रिंगण सोहळा

**विटा/प्रतिनिधी:**

संपूर्ण महाराष्ट्र पावसाच्या सरींनी व भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघत असताना प्रशालेमध्ये ज्ञानोबा माऊलीच्या दिंडीमध्ये प्रशालेचे सर्व विद्यार्थी भक्तिमय वातावरणामध्ये न्हाऊन निघाले. या दिंडी सोहळ्यातील पालखीचे पूजन प्राचार्य भाट ए जे व पत्रकार संदीप पाटील व पत्रकार प्रमोद भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर श्री ची आरती करण्यात आली. यावेळी प्रशालेमध्ये रिंगण सोहळ्यासाठी आणलेल्या अश्वाचे ही पूजन करण्यात आले.

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख, पाहीन श्रीमुख आवडीने या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांना विठ्ठलाचे दर्शन करण्याकरिता आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी वारीमध्ये ज्या पद्धतीने रिंगण सोहळा साजरा होतो त्याची अनुभूती विद्यार्थ्यांना देण्यासाठी प्रशालेमध्ये अश्व आणून रिंगण सोहळ्याचा अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आला.



इयत्ता पाचवी ते बारावीचे विद्यार्थी वारकरी पोशाखामध्ये विद्यालयामध्ये उपस्थित होते. प्रशालेमध्ये विद्यार्थ्यांनी रिंगण करून भक्ती भावाने ज्ञानोबा तुकोबा विठ्ठल यांच्या नामाचा गजर केला.

अमरापूर गावचे ह भ प श्री हरिभाऊ अमरापुरकर यांचे सर्व शिष्य यांनी प्रशाला मध्ये अभंग सादर करून संपूर्ण वातावरण विठ्ठलमय करून सोडले. यानंतर माऊलीच्या पालखीचे प्रस्थान अमरापूर गावाकडे झाले. विद्यार्थ्यांनी गावांमधून फेरी काढून विठ्ठल नामाचा जयघोष करत अमरापूर गावच्या ग्रामपंचायत समोर विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका या सर्वांनी विद्यार्थ्यासमवेत फुगड्या घातल्या.

यावेळी अमरापुर गावचे प्रथम नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने या दिंडी सोहळ्यासाठी उपस्थित होते. ग्रामस्थांनी प्रशालेच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक केले. अमोल जाधव सर यांनी आभार मानले व दिंडीची सांगता झाली.



ह. भ. प. विजय औधकर यांना राजर्षी शाहू महाराज गौरव पुरस्कार प्रदान करताना संजय पवार, सत्यजित यादव, किसनराव कुऱ्हाडे व मान्यवर.

## यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात भव्य आषाढी दिंडी सोहळा संपन्न

### ज्ञानोबा- तुकाराम' च्या गजरात विद्यार्थ्यांचा रंगला आषाढी वारीचा नेत्रदिपक सोहळा

**विटा/प्रतिनिधी:**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची व जगतगुरू संत तुकाराम महाराज यांची आषाढी वारी पायी पालखी सोहळा विठुरायाच्या भेटीसाठी शेकडो वारकर्यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ होत पांडुरंगाच्या दर्शनासाठी आसुसलेला वारकरी खांद्यावर भगवी पताका, हाती टाळ, मुखी पांडुरंगाचे नाम अन् विठ्ठल भेटीची लागलेली आस घेऊन पंढरीच्या वाटे लागला आहे. यावेळी अवघे वातावरण भक्तीमय, विठ्ठलमय झाले आहे.

या आषाढी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन भारती विद्यापीठ संचलित, यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय घोटी बुद्रुक येथे शनिवार दि. ०५ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ वाजता करण्यात आले.

आषाढी पायी दिंडी सोहळा हा उत्कृष्ट हरिपाठ कार्यक्रम व विठ्ठल भक्तीची गीते, टाळ मृदुंगाचा गजर, लेझिम पथक, झांजपथक व वारकरी वेशभुषेत पालकी सोहळा आयोजित केला.

टाळ मृदंगाच्या गजरात विद्यार्थ्यांनी हरिपाठ व विविध विठ्ठल भक्ती गीते, सादर करत विद्यार्थिनींनी फुगडी चा मनमुराद आनंद लुटला व हा भव्यदिव्य वारी सोहळा यशस्वी केला. विठ्ठल रुक्मिणी व वारकरी वेशभुषेतील विद्यार्थ्यांनी अवघे वातावरण भक्तिमय केले. पकवाज वादक आणि त्यासोबत विद्यार्थ्यांनी टाळा चा गजर करत धरलेला ताल अविस्मरणीय ठरला.

तब्बल १५० विद्यार्थ्यांनी गोल रिंगण चे आकर्षक सादरीकरण करत विठ्ठलाच्या चरणी आपली सेवा अर्पण केली.



गावातील भाविक भक्तांनी व ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पालखीचे पुजन करत विद्यार्थ्यांचे गोड कौतुक केले.खानापूर पंचायत समितीचे सदस्य गणपतराव दादा पाटील यांच्या मार्गदर्शनखाली हा सोहळा अभूतपूर्व साकार झाला. यावेळी मोहन आप्पा पाटील, उपसरपंच सुरेश जाधव, विस्वास कांबळे, मुख्याध्यापक राजेंद्र हसबे, शालिवान लोखंडे, प्रदिप मुळीक, बाजीराव प्रज्ञावंत, अनिल मगदूम, बुद्धिवान आंबवडे सर, नितीन चंदनशिवे, कु.अंकिता जाधव, मकरंद आमले, शब्बीर पटेल ए.बी.पाटील यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान दिले

यावेळी अंगणवाडी शिक्षिका, विद्यार्थी, पंचक्रोशीतील मान्यवर पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी, यांची लाक्षणिक उपस्थित लाभली.

## ह.भ.प. विजय औंधकर राजर्षी शाहू महाराज गौरव पुरस्काराने सन्मानित

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**

कासेगाव, ता. वाळवा येथील ह.भ.प. विजय औधकर यांना अविष्कार फौंडेशन कोल्हापूर यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याने राजर्षी शाहू महाराज गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले.

कासेगाव सारख्या ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू मुला, मुलींचे सरकारी अधिकारी बनण्याची स्वप्न पूर्ण करण्यासाठी कृष्णाई राज संस्कार संकुल माध्यमातून क्लासवन आधिकारी म्हणून निवड होण्यासाठी लागणारी पुस्तके, मोफत ग्रंथालय संस्कार संकुलचा माध्यमातून उपलब्ध करून आजपर्यंत संकुलचा माध्यमातून ३५ हुन अधिक मुला, मुलींची निवड झाली आहे. तसेच संस्कार वर्ग व शिंपी समाजासाठी निस्वार्थ भावनेने करत असलेल्या सामाजिक कार्यामध्ये विनायक औंधकर, नामदेव औंधकर यांची साथ मिळत आहे. या सामाजिक कार्याची कामाची दखल घेऊन त्यांना लोकराजा राजर्षी शाहू गौरव पुरस्कार कोल्हापूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत, आविष्कार फौंडेशनच्या वतीने राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त कोल्हापूर येथे कार्यक्रमात संजय पवार, सत्यजित यादव किसनराव कुऱ्हाडे यांच्या हस्ते ह. भ. प. विजय औधकर यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला.





## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात

## आषाढी एकादशी निमित्त रंगला विद्यार्थ्यांचा गोल रिंगण सोहळा

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्य.व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय यांच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी दिंडी सह पालखी व रिंगण सोहळा पार पाडला.

प्रथम पालखीसह विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्तीचे पूजन संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सेमी विभागाचे प्रमुख रूपाली शहा व ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, हे उपस्थित होते.

यावेळी माध्यमिक मराठी विभागाची संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी, माध्यमिक सेमी इंग्रजी विभागाची संत तुकाराम महाराज पालखी व कनिष्ठ महाविद्यालयाची संत गजानन महाराज पालखी अशा तीन दिशाकडून तीन पालख्या विद्यार्थ्यांनी सवाद्य टाळ, मृदंगाच्या तालात, विठ्ठल नामाच्या गजरात शाळेच्या मैदानावर एकत्रित घेऊन आल्या. यावेळी दिंडीत पारंपारिक वेशभूषेत शिक्षकांसह, मुले आणि मुली सहभागी झाले होते. मुली व शिक्षिका नऊवारी साडीत आणि मुले व शिक्षक नेहरू शर्ट,विजार व टोपी आणि सर्वजण कपाळावर गंध लावले होते. त्यामुळे दिंड्या, पताके, पालख्या, वारकरी वेशभूषेतील हा सोहळा पाहून जणू शाळेत पंढरीच अवतरली की काय असा भास होत होता. विठ्ठल नामाचा जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमला होता.

अतिशय नयनरम्य असा दिंडी व रिंगण सोहळा पार पडला. यानंतर मुला मुलींनी फुगडी, भावगीत, भक्ती गीत व पारंपरिक नृत्य सादर केले. यात विद्यार्थी शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना स्वामी व दिगंबर जगताप यांनी केले, संपूर्ण कार्यक्रमाचे चित्रीकरण व व्हिडिओ सागर मठदेवरू, विद्या बिराजदार, बालाजी कांबळे व शितल टिंगरे यानी केले तर उपस्थितांचे आभार निशिगंधा सोमेश्वर यानी मानले.

या कार्यक्रमास प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, सेवानिवृत्त माजी शिक्षक खंडेराव घाटगे, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, रविकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, कुमार जाधव, सलोनी शहा, शितल झिंगाडे, आदी शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## यशोदा टेक्निकल कँपसमध्ये बी.फार्मसी व फार्म. डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

### ऑनलाइन नोंदणीसाठी अंतिम तारीख - १४ जुलै २०२५ ;अधिकृत सुविधा केंद्र यशोदा मध्येच उपलब्ध

**सातारा/प्रतिनिधी:-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशोदा टेक्निकल कँपस, सातारा येथील फार्मसी फॅकल्टीमध्ये बी. फार्मसी (इ. झहरीरलू) आणि फार्म. डी (झहरी ऊ) अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला जात असून, ऑनलाइन नोंदणीची अंतिम तारीख १४ जुलै २०२५ आहे.

विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी यशोदा टेक्निकल कँपसमध्येच अधिकृत सुविधा केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी, प्रवेश नोंदणी प्रक्रिया आदी सर्व सेवा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात आहेत.



बी. फार्मसी आणि फार्म. डी हे दोन्ही अभ्यासक्रम वैद्यकीय आणि औषधनिर्माण क्षेत्रात उज्वल करिअर घडवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. यशोदा टेक्निकल कँपसमधील फार्मसी विभागात प्रगत प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, इंडस्ट्री कोलॅबोरेशन आणि शंभर टक्के प्लेसमेंट मार्गदर्शन उपलब्ध आहे.

या प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करून यशोदा टेक्निकल कँपस येथील सुविधा केंद्रामार्फत आपली कागदपत्रे वेळेत पडताळावीत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे आणि उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक आणि व्यावसायिक भविष्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या फार्मसी करिअरची सुरुवात यशोदा टेक्निकल कँपससारख्या नामांकित संस्थेमध्ये करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

बी. फार्मसी आणि फार्म. डी अभ्यासक्रमांसाठी यशोदा टेक्निकल कँपस ही विद्यार्थ्यांसाठी विश्वासार्ह संस्था आहे. वैद्यकीय व औषधनिर्माण क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी योग्य दिशा आणि व्यासपीठ आम्ही उपलब्ध करून देतो. प्रगत प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक आणि उद्योगजोडी यामुळे आमचा विभाग आघाडीवर आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन स्वतःचं भविष्य घडवावं, हीच आमची अपेक्षा आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये योग्य मार्गदर्शनासाठी आमचे सुविधा केंद्र तत्पर आहे.

उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, यशोदा टेक्निकल कँपस

# इसबावी येथे तरुण वारकऱ्याचा वाहनाखाली चिरडून मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधीः-**

इसबावीत अर्धवट अवस्थेतील पुलाजवळ तरुण वारकऱ्याचा वाहनाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला आहे. आज ही घटना इस बावी येथील जुन्या पूलाजवळ घडली. आज सकाळी ६ च्या दरम्यान पालखी मार्गावर इसबावी ता. पंढरपूर येथील मलपे ओढा येथिल अर्धवट पुलाच्या बांधकामाजवळ ज्ञानाई अपार्टमेंट समोर एका अज्ञात तरुण वारकऱ्याचा वाहनाखाली चिरडून जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. मयत तरूण वारकऱ्याचे वय अंदाजे २२ असल्याचे प्रत्यक्षदर्शी वारकऱ्यांनी सांगितले.

पालखी महामार्गावर इसबावी येथिल ज्ञानाई अपार्टमेंट समोरील मलपे ओढ्यावर रस्त्याचे काम सुरू असून रस्त्यावरील पुलाचे काम देखिल अनेक दिवसांपासून अर्धवट अवस्थेत आहे. आषाढी वारी २०२५ पूर्वी रस्त्याचे व पुलाचे पूर्ण काम होत नसल्याचे पाहून घाई-घाईने प्रशासनाने पुलाच्या एका बाजूस सर्विस रोड तयार करून दिला आहे. परंतु या सर्विस रोडवर एकही गतिरोधक नाही त्यामुळे वाहनांचा वेगाला मर्यादा नसते. गतिरोधक न बनवल्यास भविष्यात यापुढेही अनेक अपघात घडू शकतात.

तसेच ओढ्यातील पुलाच्या दोन्ही बाजूकडुन वाहनांची वाहने होत वाहत आहेत. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आणखी अपघात करणची शक्यता नाकारता येणार नाही. याकडे प्रशासनाचे देखील पूर्णतः दुर्लक्ष आहे.

रस्त्याचे व पुलाचे बांधकाम अर्धवट असल्याने व वाहतूकीवर नियंत्रण असल्याने आजच्या घडलेल्या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तसेच सदरील घटनेस रोड कॉन्टॅक्टरला जबाबदार धरावे की प्रशासनाला जबाबदार धरावे असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

घटना घडलेल्या याच मार्गावरून आज माहिती तंत्रज्ञान व संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार हे आज इसबावीमध्ये उपस्थितीत राहणार आहेत. ते या सर्विस रस्त्यावर किती गतिरोधक आहेत किंवा नाहीत हे नक्कीच पाहतील व संबंधितावर कारवाई करण्यास सांगतील अशी स्थानिक नागरिकांना अपेक्षा आहे.

# एकाच्या भाषणात सत्तेची, स्वार्थाची मळमळ



राज ठाकरे यांच्या भाषणातून मराठी भाषेबाबतची तळमळ दिसली, पण उद्धव ठाकरे यांच्या भाषणात मात्र केवळ सत्ता, खुर्ची आणि स्वार्थाची मळमळ होती, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. तसेच या मेळाव्यातून मराठी माणसाचा अपेक्षाभंग झाला असल्याचे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आजच्या मराठी विजयी मेळाव्यात भाषण करताना पुष्पा स्टाईलमध्ये `उठेगा नही` साला म्हणज एकनाथ शिंदेवर टीका केली. या टीकेला प्रत्युत्तर देताना, अब उठेगा नही` साला, हा डायलॉग उद्धव ठाकरेंना शोभून दिसतो, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. तीन वर्षांपूर्वी दाढीवरून अर्धाच हात फिरवल्याने ते आडवे झाले, अजूनही सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्ण दाढीवरून हात फिरवला असता, तर काय झाले असते, याचा विचार त्यांनी करावा, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

# कराड उत्तरेतील अनेकांचा एकनाथ शिंदे शिवसेना गटात जाहीर प्रवेश

## राजेंद्रसिह यादव यांचा निर्धारःसातारा जिल्ह्यात शिवसेना भक्कम करणार

**कराड/प्रतिनिधीः-**

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात अनेक चेअरमन, व्हा. चेअरमन, पदाधिकारी, युवा नेते यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटात जाहीर प्रवेश केला.



पालकमंत्री शंभूराज देसाई, संपर्कप्रमुख शरद कणसे, कराड उत्तरचे शिवसेनेचे युवा नेते पै. संतोष वेताळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकजणांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याबद्दल सातारा जिल्हा शिवसेनेचे समन्वयक राजेंद्रसिंह यादव यांनी सर्वांचे आभार मानले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात विकासाची गंगा सर्वसामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचवली. अनेक सुख, सुविधांचा, लाभ गोरगरीब गरजूंना दिला. त्यामुळे महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व सर्वसामान्य माणसाला भावलं. त्यामुळे अनेकजण शिवसेनेत जाहीर प्रवेश करीत आहेत. येणाऱ्या काळात सातारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अनेकजण शिवसेनेत जाहीर प्रवेश करतील. त्यामुळे सातारा जिल्ह्यात शिवसेनेचा वटवृक्ष होईल, असा आत्मविश्वास शिवसेनेचे सातारा जिल्हा समन्वयक राजेंद्रसिह यादव यांनी व्यक्त केला.

तसेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्वांचा पक्षाच्या माध्यमातून सन्मान करण्यात येईल. तसेच कराड उत्तर हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेनेचा बालेकिल्ला असेल, असा असा आत्मविश्वास कराड उत्तरचे शिवसेनेचे युवा नेते पै. संतोष वेताळ यांनी व्यक्त केला. गुलाबराव पवार यांनी प्रास्ताविक केले. महिला आघाडी सातारा जिल्हाध्यक्ष सुलोचना पवार यांनी आभार मानले.

।। झाडू संतांचे मार्ग ।। करू पंढरीचा स्वर्ग ।।

# पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

स्वच्छ भारत अभियान | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा ६.०

## आषाढी यात्रा २०२५

## यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वाचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सूचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

१) यात्रेकरु, दिंडीकरी,फडकरी, भाविकभक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.

२) उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.

३) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.

४) पत्रावळी व द्रोणचा वापर :- जेवणाकरीता थर्माकोल, प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याएवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा, द्रोणचा वापर करावा व प्लॉस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.

५) कचरा व्यवस्थापन :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकू नये.

६) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पाणी प्यावे.

७) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.

८) धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.

९) पार्कींग व्यवस्था ठिकाणे :- भिमा बस स्टँड मोहोळ रोड, ६५ एकर मागील बाजू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिड संकुल, अंबाबाई पटांगण, इसबाची विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग,यमाई तुकाई पार्किंग, विडारी बंगला पार्किंग, गजानन महाराज मठ क्र.१ एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी, ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग, ६५ दिंडी परिसर वाहन, सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

| | |
|---|---|
| **श्री.सचिन इथापे**<br>**प्रशासक**<br>**नगरपरिषद पंढरपूर** | **श्री.महेश रोकडे**<br>**मुख्याधिकारी**<br>**नगरपरिषद पंढरपूर** |







